स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान
विद्याशाखेतंर्गत मराठी या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

मराठी साहित्यातून चित्रित झालेले संत भगवानबाबांचे चरित्र : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

रत्नमाला बालाजी फड

डी.एड., बी.एड., एम.ए. (मराठी)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. उमेश भ. पुजारी

मराठी विभाग

श्री शिवाजी कॉलेज, कंधार

संशोधन केंद्र

भाषा वाङ्मय व संस्कृती संकुल

स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट : २०२३

प्रस्तावना

संतांनी मानवतावादी दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून ओव्या, अभंग, भजन, कीर्तन अशा साधनाच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे कार्य केले. संत स्वतः उदात्त आणि निस्वार्थपणे कार्य करीत असताना त्यांचे समाजाशी अखंडपणे नाते जोडलेले होते. जगाच्या उद्धारासाठीच त्यांनी पृथ्वीतलावर जन्म घेतलेला असावा. सामाजिक कार्य करीत असताना सामाजिक जीवनाशी एकरूप होऊन जनकल्याणाचा वसा आणि वारसा त्यांनी जपला. जगद्गुरू संत तुकारामांनी "बुडती हे जन न देखवे डोळा येतो कळवळा म्हणोनिया" म्हणजेच रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य अशा समाजविघातक चाली रीतींमध्ये बुडत असलेल्या समाजाला वाचविण्यासाठी सर्व संतांनी आपले आयुष्य वेचले. स्वतःशी आत्मसंवाद करून त्यातून त्यांनी उत्तरे शोधली. यासाठीच त्यांनी ओव्या, अभग याच बरोबर भजन-कीर्तनाच्या माध्यमातून "नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी||" या भूमिकेतून सामाजिक उद्धाराचे कार्यही केले. हे कार्य करीत असताना संतांनी कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता निखळ प्रयोजनातून सामाजिक कार्य केलेले आहे. सर्व संतांनी समाजजीवनामध्ये वावरत असताना कोणत्याही भौतिक सुखाला महत्त्व न देता उदात्त समाजोद्धारांचे कार्य डोळयासमोर ठेवून सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली.

संतांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक स्वरूपाचा होता. समाजव्यस्थेत वर्णव्यवस्थेने ज्या व्यक्तीचे अधिकार नाकारले, ज्यांची शूद्र वर्णामध्ये गणना झाली त्यांच्या उद्धारासाठी समाजातील कर्मकांड, जप-तप, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी संतांनी सामाजिक कार्याला चालना दिली. संतांना परंपरागत कर्मकांडातील व लौकिक व्यवहारातील अंधश्रद्धा नष्ट करावयाची होती. त्यासाठी लोकाभिमूख होऊन बहूजन समाजाच्या अंतरंगात व बाह्याचरणात नवचैतन्य निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तसेच सामाजिक जीवनात मानवतावाद, समता, बंधुत्व या मानवी मूल्यांची जोपासना केली. त्यांच्या प्रत्येक कृती आणि

उक्तीतून भेदभाव न करता भक्तीच्या मेळयात समानतेला अग्रगण्य स्थान होते. संतांनी वेगवेगळ्या कालखंडात बदलत्या समाजजीवनानूसार समाजोपयोगी नवीन मूल्यांची जोपसना केली. ती मूल्ये समाजात रूजविण्यासाठी साहित्य किंवा वाङ्मयाची निर्मिती केली.

या संतपरंपरेमध्ये महाराष्ट्र आघाडीवर राहिलेला आहे. कारण महाराष्ट्राला संतांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून ओळखले जाते. या संतभूमीमध्ये आध्य कवी मुकूंदराज, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत जगन्मित्र नागा, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत जनाबाई इत्यादींनी भारूड, अभंग, कीर्तन, भजन यांच्या माध्यमातून समाजातील अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीव्यवस्था इत्यादींच्या विरोधात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे महान कार्य केले.

महाराष्ट्रातील संत परंपरा सामाजिक सुधारणेबरोबरच समाजाला डोळस बनविण्याचे कार्य करीत होती. संत काल खंडात मराठवाडा दुहेरी संकटात सापडला होता. एक संकट म्हणजे समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड तर दुसरे म्हणजे निजामी जुलमी व अत्याचारी मंदिराची तोडफोड करून समाजाला बळजबरीने धर्मांतर करण्यास भाग पाडल्या जात होते. अशा वातावरणामध्ये मराठवाड्यातील संतांनी समाजाला योग्य तो मार्ग दाखविण्याचे महान कार्य केले. संत भगवानबाबा यांचेही योगदान असलेले दिसून येते.

संत भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्य केले. यामध्ये त्यांनी भक्तिमार्ग, कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी समन्वय साधला होता. तो त्यांच्या कीर्तनातही दिसून येतो. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा अशा समाज विघातक समस्यांवर प्रहार केला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, तेलंगना, आंध्रप्रदेश

आणि कर्नाटक या राज्यांमध्ये संत परंपरेच्या कार्याचा प्रचार व प्रसार करताना समता, बंधुता, एकता आणि मानवता ही मूल्ये समाजात रूजविण्याचे कार्य केले.

एकंदरीत दिशाहीन झालेल्या समाजाला दिशा देण्यासाठी किंवा अस्थिर समाजाला स्थिर करून महाराष्ट्रात खंडित पडलेली संतकार्याची चळवळ पुन्हा गतीमान करण्यासाठी इतर संता प्रमाणे संत भगवानबाबांचे मोठे योगदान राहिले आहे, आणि याच प्रतिबिंब मराठीतील विविध साहित्यकृतींमधून आविष्कृत झाले आहे.

विषय निवडीमागची भूमिका

संशोधनकार्यात विषय निवडण्याच्या भूमिकेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. क्षेत्र कोणतेही असो मग ते कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, साहित्य इत्यादींमध्ये संशोधन भूमिका केंद्रस्थानी असते. संशोधन भूमिका निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनकार्यामध्ये संशोधन भूमिका ही प्रथम पायरी असते. त्यामुळे, संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन भूमिका निश्चित करणे आवश्यक असते. महाराष्ट्रात संत परंपरेत संत नामदेवांपासून ते संत तुकाराम महाराज यांनी खूप मोठे योगदान दिले आहे.

या संतपरंपरेचा वारसा पुढे चालविण्यासाठी नंतरच्या काळात अनेक संत उदयास आले त्यातीलच संत भगवानबाबा हे एक होते. संत भगवानबाबा यांनीसुद्धा संत परंपरेचे कार्य पुढे चालवित असताना समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्यता, उच्च-नीच इत्यादीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अभंग, भजन, कीर्तन आदी साधनांच्या माध्यमातून महत्वपूर्ण कार्य केले. या त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी “मराठी साहित्यातून चित्रित झालेले संत भगवानबाबांचे चरित्र : एक चिकित्सक अभ्यास” हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी खालील संशोधानची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. मराठी संत वाङ्मयाचा आणि संतांच्या कामगिरीचा आढावा घेणे.
२. संत भगवानबाबांची कौटुंबिक आणि सामाजिक पार्श्वभूमी विशद करणे.
३. मराठी संत परंपरेमध्ये भगवानबाबांचे योगदान निश्चित करणे.
४. संत भगवानबाबांच्या उपलब्ध साहित्यांची वाङ्मयीन चिकित्सा करणे.
५. लोकवाङ्मयातून प्रकट झालेले भगवानबाबांचे चरित्र अभ्यासणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये

१. मराठी संत परंपरेत संत भगवानबाबा यांचे स्थान महत्वपूर्ण आहे.
२. मराठी संत परंपरेतील प्रबोधनात्मक कार्यात संत भगवानबाबा यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.
३. संत भगवानबाबा चरित्र व कार्यासंबंधाने मराठी साहित्यात विपूल प्रमाणात लेखन झालेले आहे.
४. संत शेकुबा यांचा प्रभाव संत भगवानबाबा यांच्या व्यक्तिमत्त्वावर मोठ्या प्रमाणात पडलेला आहे.
५. मराठी लोकवाङ्मयात संत भगवानबाबा यांचे विचार व वाङ्मय जनमानसात रुजलेले आहे.

संशोधन विषयाचे महत्व

महाराष्ट्र ही जशी शूर वीरांची जन्मभूमी आहे तशीच ती संतांची सुद्धा आहे. या महाराष्ट्रामध्ये संत परंपरेत अनेक संत होऊन गेले आहेत. जसे की, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव,

संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत जगन्मित्र नागा, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत समर्थ रामदास स्वामी, रोहिदास, विसोबा खेचर, सोपानदेव, संत मुक्ताई, संत जनाबाई, संत बहिणाबाई इत्यादी संत आणि त्यांचे कार्य सर्व महाराष्ट्राला परिचित आहे. निरंतर महाराष्ट्रामध्ये संत परंपरा सुरूच राहिली आहे. वरील संतांप्रमाणे बीड, उस्मानाबाद, अहमदनगर या परिसरातील संत भगवानबाबा हे सुद्धा संत होऊन गेले आहेत. भगवानबाबांनी बीड, उस्मानाबाद आणि अहमदनगर भागामध्ये संत परंपरेचे कार्य करताना त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्येतेवर कडाडून हल्ला केला. तसेच फुले, शाहू आणि आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची पेरणी करण्याचे काम केले. त्यांनी समाजात जाणीव जागृती केल्यामुळे तेथील उसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या हातातील कोयत्याची जागा लेखनीने घेतली. त्यामुळे तेथील उसतोड कामगारांची मुली-मुले देशाच्या विविध भागात सर्वोच्च पदावर विराजमान झाली आहेत. या भागामध्ये संत भगवानबाबांचा समाजावर खूप मोठा पगडा आहे; परंतु संत भगवानबाबांचे कार्य बीड, काही प्रमाणात उस्मानाबाद आणि अहमदनगर या जिल्ह्याचे क्षेत्र वगळता इतर कुठेही त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार झालेला नाही, असे असले तरी राजकीय दृष्टिकोनातून महाराष्ट्रामध्ये भगवानगडाची भूमिका मध्यवर्ती राहिलेली दिसून येते. त्यामुळे भगवानबाबांच्या कार्याचा प्रसार होण्यासाठी त्यांच्या कार्यावर संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हः पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय. प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत निष्कर्ष स्वीकृत

झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्ह: पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतात काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते. अशा प्रकारे संशोधन हा सतत सत्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटित प्रयत्न आहे.

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत संशोधन असे तीन प्रकार पडतात. व्याहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक आहे. क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह, सामाजिक सुधारणा, प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन किंवा पक्षपद्धती यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्भवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थलकालपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय व्यष्टी (Case) किंवा मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे तौलनिक, ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतींचा वेळप्रसंगी उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची साधने

संशोधनामध्ये प्राथमिक व द्वितीय साधनांचा समावेश होतो. प्राथमिक साधनांमध्ये संत भगवानबाबांनी लिहिलेले ग्रंथ, लेख, अभंग इत्यादींतून माहिती संकलित करण्यात येणार आहे. तर द्वितीय साधनांमध्ये संत भगवानबाबांशी संबंधित विविध लेखक, विचारवंत यांचे ग्रंथ, मासिके, साप्ताहिक तसेच शासनाची विविध प्रकाशने, वेबसाईट याचाही आधार घेण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा

संशोधन कार्याला निश्चित स्वरूपाची दिशा किंवा मर्यादा असणे महत्त्वाचे आहे. कारण, संशोधनाला विशिष्ट मर्यादा नसेल तर संशोधन कार्य भरकटत असते. ज्याप्रमाणे अथांग समुद्रामध्ये एखाद्या जहाजाचे होकायंत्र काम करत नसेल तर ते भरकटत असते. त्याचप्रमाणे संशोधनाला मर्यादा नसतील तर संशोधनसुद्धा दिशाहीन होत असते. त्यामुळे संशोधनाला निश्चित आकार येण्यासाठी संत भगवानबाबांचा विचार आणि वाङ्मय या संबंधी संशोधनाचे क्षेत्र आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे. असे असले तरी अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने काही संदर्भ साहित्याचा उल्लेख येऊ शकतो.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले : मराठी संत साहित्याची पार्श्वभूमी आणि परंपरा

प्रस्तुत पहिल्या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील आद्य कवी मुकुंदराज, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत जगन्मित्र नागा, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत जनाबाई इत्यादी संतांनी महाराठी साहित्यामध्ये दिलेल्या योगदानाची पार्श्वभूमी आणि परंपरा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकर दुसरे : भागवत (वारकरी) संप्रदायाचे तत्वज्ञान आणि साहित्य

मानवताधर्माचा गाभा असलेला आणि एकेश्वर भक्तीला प्राधान देणारा संप्रदाय म्हणजेच 'भागवत' धर्म होय. 'भगवत्' या संस्कृत शब्दाचा ईश्वर असा अर्थ असून 'भागवत' हे त्या शब्दापासून बनलेले विशेषण आहे. या भागवत धर्माचे वारकरी संप्रदायातील तत्वज्ञान आणि साहित्याचा समाजावर खूप मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात भागवत धर्माचे तत्वज्ञान आणि साहित्य या घटकांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : संत भगवानबाबांचे चरित्र आणि वारकरी संप्रदायातील त्यांचे योगदान

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात वंजारी समाजाची पार्श्वभूमी, संत भगवानबाबा यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, जन्म, बालपण, शिक्षण, प्रभाव तसेच संत भगवानबाबांनी भजन, कीर्तनाच्या माध्यमातून केलेल्या समाज प्रबोधनाच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : संत भगवानबाबा यांच्या चरित्रपर साहित्याचे स्वरूप

प्रस्तुत चौथ्या प्रकरणामध्ये संत भगवानबाबांच्या साहित्याचा आढावा घेण्याबरोबर त्यांच्या चरित्रावर इतरांनी केलेल्या साहित्य निर्मितीच्या स्वरूपाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : संत भगवानबाबा यांच्या चरित्रपर साहित्याचे आशय विश्लेषण

प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये संत भगवानबाबा यांच्या मराठी साहित्यातील योगदानाचा आढावा घेऊन समकालीन स्थितीमध्ये त्यांच्या कार्याची चिकित्सा करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार आणि निष्कर्ष

प्रस्तुत सहावे प्रकरण हे उपसंहार आणि निष्कर्ष असे असून या प्रकरणामध्ये अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष देण्यात येणार आहेत.

संदर्भग्रंथ

१. चव्हाण वसंत दादासाहेब, श्री भगवानबाबांचे चरित्र, प्रथमावृत्ती, १९७९

२. शेमडे नामदेव लिंबाजी, धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायणगढ, रामदास प्रकाशन, शेकटा, प्रथामवृत्ती, २०१३

३. कळसे एन. के., गीतगाथा भगवानबाबांची, जुगल किशोर राजदंड प्रकाशन, परळी, द्वितीयावृत्ती, १९९१

४. चौरे उत्तम ज्ञानोबा, सदगुरू भगवानबाबा चरित्र, प्रथमावृत्ती, २००९

५. आबुज एकनाथ, संत भगवानबाबा चरित्र आणि कार्य, कल्पना प्रकाशन, बीड, प्रथमावृत्ती, २०१०

६. कराड एकनाथ, समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबा, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २०११

७. गिते गंगाधर, राष्ट्रसंत भगवानबाबा आणि मूलनिवासी जातीची दिशा, मूलनिवासी, ट्रस्ट, पुणे, प्रथमावृत्ती, २०११

८. घुले राजकुमार पंढरीनाथ, राजयोगी महंत भगवानबाबा, गणेश ऑर्टस प्रींटर्स, अहमदनगर, प्रथमावृत्ती, २०११

९. तांदळे के.टी., संत भगवानबाबा जीवन व कार्य, गोपिका प्रकाशन, बीड, प्रथमावृत्ती, २०११

१०. गर्जे अर्जुनराव, अमर किर्तिवंत : संत भगवानबाबा, मोरया गाफ्रिक्स शेगाव, प्रथमावृत्ती, २०१३

११. मिसाळ भगवान वामन, राजयोगी श्री भगवानबाबा, मे. शारदा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१३

१२. मुंडे सुखदेव, कर्मयोगी भगवानबाबा, वावर प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २०१३

१३. पाटील प्रदीप, संदर्भ शोधतात, संगत प्रकाशा, नांदेड, प्रथमावृत्ती, २००२

१४. मोरे दादासाहेब, विमुक्त, गुलाबराव मारोती कारले, सुरेश एजसी, पुणे, १९९४

१५. यादव आनंद, उखडलेली झाडे, सुनील अनील मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४

१६. पाटील व्ही.बी., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती, २०१२

१७. नाडगोडे गुरुनाथ, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

१८. दराडे (प्रा.) एस.डी., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

१९. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher. 2006

संशोधक

रत्नमाला बालाजी फड
डी.एड., बी.एड., एम.ए. (मराठी)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. उमेश भ. पुजारी
मराठी विभाग
श्री शिवाजी कॉलेज, कंधार